**४**

**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १९(०१)**

क्रमांक २०१६/भूसं/ कक्ष-२/सीआर-२४. - ज्या अर्थी, समुचित शासन असलेल्या उस्मानाबाद जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांस भूमीसंपादन, पूनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे) याच्या कलम ११(०१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूचित एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीचा अनुसूचित दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ठ केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासवण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, उस्मानाबाद जिल्हयाच्या जिल्हाधिका-याचे कलम १५ च्या पोटकलम (०२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (०१) च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषीत करण्यात आहे आणि ज्या अर्थी अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियांच्या पुनर्वसन व पुर्नवसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणून निर्धरित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुर्नवसाहत योजनेच्या सारांश अनुसूचित चार मध्ये विनिर्दिष्ट केले आहे.

आणि ज्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-याची कार्य पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, भूम यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची एक

**जमिनीची वर्णन**

**गाव** :- नागेवाडी **तालुका** :- भूम **जिल्हा** :- उस्मानाबाद

| अ.क्र. | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | ३२१ जुना, ३४ नवीन | ३.८३ |
| २ | ३२२ जुना, ३५ नवीन | ०.८० |
| | एकूण | ४.६३ |

**अनुसूची २**

**सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण**

**प्रकल्पाचे नांव** : नागेवाडी पाझर तलाव ता.भूम जि.उस्मानाबाद

**प्रकल्पाचे वर्णन :** पाझर तलाव मौजे नागेवाडी ता.भूम जि.उस्मानाबाद या प्रकल्पामुळे ४.९८ दश लक्ष घन फुट पाणी साठा होणार आहे. त्यामुळे मौजे नागेवाडी ता.भूम येथील अवर्षण प्रवण क्षेत्राचा सिंचनाचा लाभ होणार आहे.

**समाजाला मिळणारे लाभ :** भूम तालूक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रात या पाझर तलावामुळे मौजे नागेवाडी ता.भूम जि.उस्मानाबाद येथील क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

**अनुसूची तीन**

**बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.**

नागेवाडी पाझर तलाव ता.भूम जि.उस्मानाबाद या कामामुळे कुठल्याही व्यक्तीचे विस्थापन होणार नाही.

**अनुसूची चार**

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अधिका-याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)**

सदरच्या प्रकरणातील संपादीत जमीनीसाठी प्रस्तुतचा प्रकल्प २००१ मध्येच पुर्ण झालेला असून, सदरच्या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.६७३२/२०११ मधील दि.२८/०१/२०१६ रोजीच्या आदेशास अधिन राहुन तातडीने कार्यवाही करणे आवश्यक असल्यामुळे सदरच्या प्रकरणी सामाजिक आघात सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यास अहवाल तयार करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम लागू नाही.

ब. प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता लागू नाही.

क. ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील लागू नाही.

**टिप** : १) सदर प्रकल्पासाठी होणा-या भूसंपादनामुळे कुठल्याही व्यक्तीचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे अधिनियम ४३ अन्वये प्रशासकाची नियुक्ती केलेली नाही.

२) उक्त जमिनीच्या आराखडयाचे कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, उस्मानाबाद या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी भूम यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

उस्मानाबाद, ०६/१०/२०१७.

साक्षांकित
उप जिल्हाधिकारी
(भूसंपादन समन्वय), उस्मानाबाद

स्वाक्षरीत/-
(रा.वि.गमे)
जिल्हाधिकारी, उस्मानाबाद